वृत्तपत्र

दि.२७/१२/२०२५

## विश्वकर्मा सुपरमार्ट सर्व्हीसेस आणि विश्वकर्मा सुपरमार्ट प्रा. लि., कोडोली, सातारा व त्यांच्या इतर शाखांमध्ये आर्थिक गुतवणूक केलेल्या गुतंवणूकदारांना जाहीर आवाहन

---

विश्वकर्मा सुपरमार्ट सर्व्हीसेस आणि विश्वकर्मा सुपरमार्ट प्रा. लि., कोडोली, सातारा या कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यास १३.५ टक्के दराने परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत सातारा शहर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ८७४/२०२३, कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ भारतीय दंड संहिता, कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास सातारा शहर पोलीस ठाण्याकडून सुरु होता. परंतू सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा यांचेकडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने सर्व गुंतवणूकदारांना असे आवाहन करण्यात येते की, विश्वकर्मा सुपरमार्ट सर्व्हीसेस आणि विश्वकर्मा सुपरमार्ट प्रा. लि., कोडोली, सातारा व त्यांच्या इतर शाखांमध्ये ज्या गुंतवणूकदारांनी आर्थिक व अन्य गुंतवणूक केली आहे, त्यांनी दि.०३/०१/२०२६ ते ०९/०१/२०२६ या कालावधीत सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी ०६.०० वाजण्याच्या दरम्यान आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथे खालील कागदपत्रांसह चौकशीकामी उपस्थित रहावे.

(१) गुंतवणूक केल्याचा पुरावा, उदाहरणार्थ :- मुळ ठेव पावती, प्रमाणपत्र, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.
(२) गुंतवणूकदाराचे बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.
(३) गुंतवणूकदाराचे आधारकार्ड
(४) गुंतवणूकदाराचे पॅनकार्ड
(५) गुंतवणूकदारास अंशत: किंवा पुर्णत: किंवा गुंतवणूकदारास व्याजासह मिळालेल्या परताव्याचा पुरावा, उदाहरणार्थ :- पावती, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.
(६) वरील बँक खात्यास जे वारसदार आहेत, त्यांचे आधारकार्ड व पॅन कार्ड
(७) वर नमूद कागदपत्रांच्या ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.

सातारा शहर पोलीस टाणे येथे दाखल वरील गुन्हयाच्या तपासात पुरावा गोळा करण्यासाठी तसेच गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळण्यासाठी महाराष्ट्र ठेविदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ या कायद्यान्वये करावयाच्या कार्यवाहीसाठी वरील प्रमाणे नमुद वेळी, नमुद कागदपत्रांसह गुंतवणूकदारांनी उपस्थित राहण्यास आवाहन करण्यात येत आहे.

वर नमुद कंपनीने केलेल्या फसवणूकीबाबत काही गुंतवणूकदारांनी केलेल्या तक्रारीनुसार (१) दहीवडी पोलीस टाणे, जि. सातारा येथे गु.नों.क्र. ७६४/२०२३, कलम ४२०, ३४ भारतीय दंड संहिता, कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये आणि (२) वडगाव निंबाळकर पोलीस टाणे, जि. पुणे येथे गु.नों.क्र. ६६/२०२४, कलम ४०६, ४२०, ३४ भारतीय दंड संहिता, कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हे दाखल झालेले आहेत. या गुन्ह्यांच्या तपासकामी ज्यांनी या संबंधीत पोलीसांकडे जबाब दिलेले आहेत, त्यांनी वर नमुद कालावधीत आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथे उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

---